वर्ष : १३९

Regd.No. PCW/002/2018-2020-S.P.College Post-RNI No. 1755/57

केसरी

राष्ट्रीय ठेवा

• अंक ८० • पृष्ठे : ८+छावा पुरवणी • पाच रुपये • शनिवार २३ मार्च २०१९, पुणे C (शहर आवृत्ती)

इराकमध्ये बोट उलटून १०० जणांचा मृत्यू

मोसूल : इराकमधील मोसूल शहराजवळील टिगरिस नदीत बोट बुडून झालेल्या दुर्घटनेत सुमारे १०० लोकांचा मृत्यू झाला आहे. मृतांमध्ये ६१ महिला आणि १९ लहान मुलांचा समावेश आहे. तर ५५ लोकांना वाचविण्यात आले आहे. इराकमधील ही सर्वात मोठी दुर्घटना आहे. या घटनेनंतर इराकचे पंतप्रधान अदेल अब्दुल महदी यांना तीन दिवसांचा राष्ट्रीय दुखवटा जाहीर केला आहे. गेल्या काही दिवसांपासून जोरदार पाऊस पडत असल्यामुळे मोसूल येथील धरणातून टिगरिस नदीत पाणी सोडण्यात आले आहे. यामुळे नदीतील पाण्याची पातळी वाढली आहे. या पार्श्वभूमीवर प्रशासनाने नदी काठावरील लोकांना सावधानतेचा इशारा दिला होता.

विजापूर-सिंदगी मार्गावर अपघातात ९ ठार

सोलापूर : विजापूर-सिंदगी राज्य महामार्गावर कंटेनर आणि मोटारीच्या भीषण अपघातात ९ जण जागीच ठार झाले. तर पाच गंभीर जखमी आहेत. शुक्रवारी पहाटे विजापूर जिल्ह्यातील चिक-सिंदगी गावाजवळ हा अपघात झाला. जखमींना सिंदगीच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. यापैकी काहींची प्रकृती गंभीर आहे. होळीच्या सुट्टीनिमित्त ते सर्व मोटारीने गोव्याला गेले होते. गोव्याहून परतत असताना हा अपघात झाला. अपघातानंतर सिंदगी-विजापूर मार्ग काही काळासाठी बंद ठेवण्यात आला होता. त्यामुळे प्रचंड वाहतूक कोंडी झाली होती.

सविस्तर वृत्त आतील पानात

एक एप्रिलपासून गॅस महागणार?

नवी दिल्ली : आगामी आर्थिक वर्षापासून (एक एप्रिल) सीएनजी, पीएनजी आणि घरगुती गॅसच्या दरात वाढ होण्याची शक्यता आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, नैसर्गिक वायूच्या किमतीत १८ टक्के वाढ होण्याची शक्यता आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात निर्माण झालेल्या मागणीमुळे नैसर्गिक वायूच्या दरांमध्ये वाढ होण्याची शक्यता आहे. सध्याच्या गॅस धोरणानुसार, केंद्र सरकार दर सहा महिन्यांनी नैसर्गिक वायूच्या किमतींचा आढावा घेते. गेल्या वर्षभरात नैसर्गिक वायूच्या किमतीत दोन वेळा (५.९ टक्के आणि ९.८ टक्के) वाढ झाली. मात्र, लवकरच आणखी वाढ होण्याची शक्यता आहे.

'जैश'चा दहशतवादी सज्जाद खानला अटक

नवी दिल्ली : जैश ए महमदचा दहशतवादी सज्जाद खान याला दिल्ली पोलिसांच्या विशेष शाखेने अटक केली आहे. सज्जाद हा पुलवामा हल्ल्याचा सूत्रधार मुदस्सीरचा निकटवर्तीय असल्याची माहिती पोलिसांनी दिली. सज्जाद हा दिल्लीत शाल विकण्याचे काम करत होता. सज्जाद खानला झालेली अटक हे सुरक्षा दलांसाठी मोठे यश मानले जात आहे. परवा रात्री त्याला लाल किल्ला परिसरातून दिल्ली पोलिसांच्या विशेष पथकाने अटक केली. राष्ट्रीय तपास यंत्रणा आणि गुप्तचर यंत्रणेचे अधिकारी सज्जादची कसून चौकशी करत आहेत. सज्जाद खान मुदस्सीरच्या संपर्कात होता.

गौतम गंभीरचा भाजपमध्ये प्रवेश

नवी दिल्ली : भारतीय क्रिकेट संघाचा माजी फलंदाज गौतम गंभीरने शुक्रवारी केंद्रीय मंत्री अरुण जेटली आणि रवीशंकर प्रसाद यांच्या उपस्थितीत भाजपमध्ये प्रवेश केला आहे. गौतम गंभीरने भाजपात प्रवेश केल्याने पक्षाला नक्कीच फायदा होईल असा विश्वास अरुण जेटली यांनी व्यक्त केला आहे. नरेंद्र मोदींच्या कामापासून प्रभावित होऊन मी भाजपात प्रवेश केला असल्याचे यावेळी गौतम गंभीरने सांगितले. देशासाठी काम करण्याची संधी दिल्याबद्दल यावेळी गंभीरने भाजपचे आभार मानले.

जाता जाता – गणेश काटकर

तिकीट कापल्याने तोंड काळे झालेय की कोणी रंग लावला?

विद्यमान खासदारांनाच शिवसेनेची पसंती

रवी गायकवाडांना मात्र डच्चू; पार्थविरोधात श्रीरंग बारणे

मुंबई, (प्रतिनिधी) : शिवसेनेने शुक्रवारी आपल्या वाटणीत आलेल्या लोकसभेच्या २३ पैकी २१ लोकसभा मतदारसंघातील उमेदवारांची घोषणा केली. केंद्रीय मंत्री अनंत गीते, आनंदराव अडसूळ, चंद्रकांत खैरे यांच्यासह १८ पैकी १७ खासदारांना पुन्हा उमेदवारी देण्यात आली आहे. उस्मानाबादचे विद्यमान खासदार रवी गायकवाड यांना मात्र उमेदवारी नाकारण्यात आली असून, येथे माजी आमदार ओमराजे निंबाळकर यांना उमेदवारी देण्यात आली आहे. हिंगोलीतून हेमंत पाटील यांना, तर कोल्हापूर येथून संजय मंडलिक यांना उमेदवारी देण्यात आली आहे.

आढळराव-पाटील

श्रीरंग बारणे

हे आहेत उमेदवार

- शिरूर : **शिवाजीराव आढळराव**
- मावळ : **श्रीरंग बारणे**
- शिर्डी : **सदाशिव लोखंडे**
- कोल्हापूर : **संजय मंडलिक**
- हातकणगले : **धैर्यशील माने**
- नाशिक : **हेमंत गोडसे**
- दक्षिण मुंबई : **अरविंद सावंत**
- दक्षिण मध्य मुंबई : **राहुल शेवाळे**
- उत्तर पश्चिम : **गजानन कीर्तीकर**
- ठाणे : **राजन विजारे**
- कल्याण : **श्रीकांत शिंदे**
- रायगड : **अनंत गिते**
- रत्नागिरी : **विनायक राऊत**
- बुलडाणा : **प्रतापराव जाधव**
- अमरावती : **आनंदराव आडसूळ**
- रामटेक : **कृपाल तुमाने**
- यवतमाळ-वाशिम : **भावना गवळी**
- परभणी : **संजय जाधव**
- औरंगाबाद : **चंद्रकांत खैरे**
- उस्मानाबाद : **ओमराजे निंबाळकर**
- हिंगोली : **हेमंत पाटील**

लोकसभा निवडणुकीसाठी शिवसेना उमेदवारांची पहिली यादी शिवसेना नेते व उद्योग मंत्री सुभाष देसाई यांनी काल जाहीर केली. अपेक्षेप्रमाणे रवी गायकवाड यांचा अपवाद वगळता उर्वरित सर्व १७ खासदारांना शिवसेनेने उमेदवारी दिली आहे. रवी गायकवाड यांना स्थानिक पातळीवर पक्षातून मोठा विरोध होता. तसेच गेल्या पाच वर्षांत त्यांनी मतदारसंघात फारसा संपर्क ठेवला नसल्याचाही आरोप होता. तसेच राष्ट्रवादी काँग्रेसने राणा जगजितसिंग पाटील यांना रिंगणात उतरवल्याने त्यांचे परंपरागत प्रतिस्पर्धी ओमराजे निंबाळकर यांना उमेदवारी देण्याचा निर्णय शिवसेनेने घेतला आहे. हिंगोली मतदारसंघातून हेमंत पाटील यांना उमेदवारी देण्यात आली आहे. तर कोल्हापूर येथून संजय मंडलिक यांना, तर हातकणंगले मधून माजी खासदार निवेदिता माने यांचे चिरंजीव धैर्यशील माने यांना उमेदवारी दिली आहे.

लोकसभा निवडणुकीत शिवसेना २३ जागा लढवणार असून, सातारा व पालघर अशा या उर्वरित जागा असतील, असा अंदाज आहे. पालघरची जागा भाजपकडे असून त्यासाठी शिवसेनेने प्रतिष्ठा पणाला लावली आहे. ही जागा शिवसेनेला मिळणार का? याबाबत अजून स्पष्टता नाही. उद्योगमंत्री सुभाष देसाई यांनीही काल याबाबत मौन बाळगताना उर्वरित दोन जागांबाबत रविवारी घोषणा केली जाईल, असे सांगितले. दरम्यान, सातारा मतदारसंघात उदयनराजे भोसले यांच्या विरोधात लढण्याच्या तयारीत असलेल्या माथाडी कामगारांचे नेते व आण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील यांनी काल शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची भेट घेतली. यामुळे ते शिवसेनेतून लढणार अशी चर्चा आहे. त्यांच्या उमेदवारीबाबत उद्या निर्णय जाहीर केला जाईल, असे उद्धव ठाकरे यांनी सांगितले.

संजय काकडे भाजपमध्येच

पुण्याचा कारभारी व्हायचे आहे

- संजय काकडे यांना पुण्याचा कारभारी व्हायचे आहे. तशी इच्छा त्यांनी वरिष्ठांकडे बोलून दाखवली आहे. लोकसभा निवडणुकीनंतर त्यांच्यावर महत्वाची जबाबदारी देण्यात येणार असल्याची माहिती सुत्रांनी दिली. बारामतीमधून उषा काकडे यांना उमेदवारी मिळण्याची शक्यता आहे. काकडे यांनी भविष्यातील राजकारणाचे वेध घेवूनच प्रवेश थांबवला असल्याची चर्चा आहे. मात्र, त्यांच्या हा धरसोड वृत्तीचा फटका भाजपला सुध्दा बसण्याची शक्यता आहे.

पुणे : लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस प्रवेश करायला निघालेले भाजपचे सहयोगी खासदार संजय काकडे हे भाजपमध्येच राहणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काकडे यांना चांगलाच दम भरला असल्याची चर्चा आहे.

गेल्या काही दिवसांपासून संजय काकडे यांच्या काँग्रेस प्रवेशाची आणि उमेदवारीची बोलणी सुरु असल्याची चर्चा होती. काकडे हे पुण्यातून भाजपच्या उमेदवारीसाठी इच्छूक होते. मात्र, उमेदवारी मिळणार नाही, हे समजताच त्यांनी काँग्रेसशी संपर्क साधला. प्रदेशाध्यक्ष अशोक चव्हाण यांची भेट घेवून कांग्रेस प्रवेशाबाबत बोलणीदेखील केली. त्यासाठी दिल्लीवारीही केली होती. मात्र, काँग्रेस प्रवेशाची घोषणा हवेतच विरली आहे. लोकसभा निवडणुकीत भाजपच्या उमेदवारांचा प्रचार करणार असल्याची ग्वाही काकडे यांनी पक्षनेतृत्त्वाला दिली. तसेच काँग्रेस प्रवेशाचा विचारही रद्द केला आहे.

संजय काकडे यांचे मन सहकारमंत्री आणि काकडे यांचे व्याही सुभाष देशमुख यांनी वळविले आहे. मुख्यमंत्र्यांनी काकडे यांना भविष्यातील जबाबदारीची ग्वाही दिली. त्यामुळे त्यांनी भाजपमध्येच राहण्याचा निर्णय पक्का केला. काकडे यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश करण्याची घोषणा १० मार्च रोजी केली होती. त्यानंतर त्यांची दोन वेळा मुख्यमंत्र्यांशी भेट झाली. दोन दिवसांपूर्वीच्या भेटीत मुख्यमंत्र्यांनी लोकसभा निवडणुकीनंतर त्यांना योग्य तो मान देण्याचे आश्वासन दिले. यानंत त्यांनी काँग्रेस प्रवेशाचा बेत रद्द केला. काकडे हे भाजपमध्येच राहणार असल्याने त्यांच्या समर्थक नगरसेवकांनीही सुटकेचा निश्वास टाकला आहे. तसेच पुण्यातील संभाव्य भाजप उमेदवाराला त्याचा उपयोग होणार आहे. सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, पुण्याच्या कारभाऱ्यावर काकडे खुश नाहीत. पुण्याचे नेतृत्व त्यांच्याकडे द्यावे, अशी मागणी काकडे यांनी वरिष्ठांकडे केली आहे.

लालूभाई पटेल यांना उमेदवारी

नवी दिल्ली : भारतीय जनता पक्षाने लोकसभा निवडणुकीसाठी शुक्रवारी दुसरी यादी जाहीर केली. मात्र, या यादीत एकाच उमेदवाराचा समावेश आहे. भाजपने दमण आणि द्वीपसाठी लालूभाई पटेल यांची उमेदवारी काल घोषित केली. या ठिकाणी तिसऱ्या टप्प्यात २३ एप्रिल रोजी मतदान होणार आहे.

पत्नीवर गोळी झाडून सहसचिवाची आत्महत्या

सोलापूर, (प्रतिनिधी) : घरगुती वादातून मंत्रालयातील एका सहसचिवाने पत्नीवर गोळी झाडून स्वत: गळफास घेत आत्महत्या केल्याचा धक्कादायक प्रकार घडला आहे. विजयकुमार भागवत पवार या सहसचिवाचे नाव आहे. मंगळवेढा तालुक्यातील मरवडे येथे गुरुवारी रात्री १२.३० च्या सुमारास ही घटना घडली. पत्नी सोनाली पवार यांच्यावर सोलापूर येथील एका खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. त्यांना दोन गोळ्या लागल्या असून त्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती वैद्यकीय सूत्रांनी दिली आहे. विजयकुमार हे मंत्रालयातील कौशल्य विकास विभागात सहसचिव पदावर कार्यरत असून, परवा ते गावी आले होते. रात्री पती व पत्नीमध्ये जोरदार भांडण झाले होते. घरगुती वादातून विजयकुमार यांनी टोकाचे पाऊल उचलल्याचे सांगण्यात आले. विजय पवार यांनी सरदार सरोवर गाऱ्हाणे निराकरण प्राधिकरणाचे अपर जिल्हाधिकारी म्हणून नंदुरबार येथे अडीच वर्षे काम पाहिले आहे. तीन वर्षांपूर्वी त्यांची येथून बदली झाली होती.

ओलिस ठेवलेल्या मुलाची दहशतवाद्यांकडून हत्या

पाच दहशतवाद्यांचा चकमकीत खात्मा

श्रीनगर : जम्मू-काश्मीरच्या बांदीपोरा जिल्ह्यात ओलिस ठेवलेल्या ११ वर्षांच्या मुलाची दहशतवाद्यांकडून हत्या करण्यात आली. सुरक्षा दलाच्या जवानांनी दोघाही दहशतवाद्यांना कंठस्नान घातले आहे. तर, शोपियाँत एका दहशतवाद्याचा खात्मा करण्यात आला. गेल्या चोवीस तासांत चकमकीत पाच दहशतवाद्यांना कंठस्नान घालण्यात आले आहे. यापैकी दोघे पाकिस्तानी असून लष्कर ए तैयबामध्ये सक्रिय होते. अली आणि हबीब अशी त्यांची नावे आहेत.

बांदीपोरा जिल्ह्यातील हाजीन परिसरात गुरुवारी सायंकाळपासून ही चकमक सुरू होती. दहशतवाद्यांनी दोघांना ओलिस धरले होते. यापैकी वयोवृद्ध व्यक्तीची परवाच सुटका करण्यात यश आले होते. मात्र, ११ वर्षांचा मुलगा दहशतवाद्यांच्या ताब्यात होता. दहशतवाद्यांकडून त्या मुलाची हत्या करण्यात आली. दोघाही दहशतवाद्यांना सुरक्षा दलांनी कंठस्नान घातले. या दोघांचीही ओळख पटली आहे. शोधमोहिमेदरम्यान तिघांचे मृतदेह हाती लागले.

जम्मू-काश्मीरच्या शोपियाँ जिल्ह्यात सुरक्षा दलाबरोबर झालेल्या चकमकीत एक दहशतवादी मारला गेला. दक्षिण काश्मीरच्या शोपियाँतील इमामसाहेब परिसरात काही दहशतवादी असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार, जवानांनी शोधमोहीम हाती घेतली. जवानांनी दहशतवाद्यांना घेरले. चहूबाजूने वेढले गेल्याचे लक्षात येताच दहशतवाद्यांनी जवानांच्या दिशेने गोळीबार सुरू केला. प्रत्युत्तरादाखल केलेल्या कारवाईत एक दहशतवादी मारला गेला. अद्याप त्याची ओळख पटलेली नाही. तसेच, तो कोणत्या दहशतवादी संघटेशी संबंधित आहे, हेही कळू शकलेले नाही. दरम्यान, उत्तर काश्मीरच्या बारामुला जिल्ह्यातील सोपोरमध्ये दहशतवादी आणि सुरक्षा दलाच्या जवानांमध्ये चकमक सुरू आहे. सोपोरच्या वारपोरा परिसरात ही चकमक सुरू आहे. गुरुवारी सकाळी दहशतवाद्यांनी केंद्रीय राखीव पोलिस दलाच्या पथकावर ग्रेनेड हल्ला केला होता. यात तीन जण जखमी झाले होते. त्याआधी बारामुलाच्या कलंतरा परिसरात दोन दहशतवाद्यांना सुरक्षा दलाच्या जवानांनी कंठस्नान घातले होते.

जम्मू काश्मीर लिबरेशन फ्रंटवर बंदी

नवी दिल्ली : फुटीरतावादी नेता यासिन मलिक याच्या जम्मू काश्मीर लिबरेशन फ्रंट (जेकेएलएफ) वर केंद्र सरकारने बंदी घातली आहे. दहशतवाद विरोधी कायद्याअंतर्गत बंदी घालण्यात आली आहे. या निर्णयामुळे फुटिरतावाद्यांना जोरदार धक्का बसला आहे.

यासिन मलिकच्या जेकेएलएफ संघटनेवर दहशतवादी कारवायांना समर्थन दिल्याचा आरोप आहे. फुटीरतावादी विचारांना प्रोत्साहन देऊन त्या विचारांचा प्रसार जम्मू काश्मीरमध्ये केला जातो आहे, असा ठपका जेकेएलएफवर ठेवण्यात आला असून या बेकायदा कृत्यांवर बंदी घालण्यासाठी हे पाऊल उचलण्यात आले आहे, असे केंद्राने स्पष्ट केले आहे.

यासिन मलिक हा सध्या अटकेत असून त्याला जम्मू येथील बालवल कारागृहात त्याची रवानगी करण्यात आली आहे. पुलवामा हल्ल्यानंतर केंद्र सरकारने फुटिरतावाद्यांची सुरक्षा काढून घेतली होती. त्यानंतर, २८ फेब्रुवारी रोजी केंद्र सरकारने जमात ए इस्लामी या संघटनेवर ५ वर्षासाठी बंदी आणली होती. त्याचसोबत गृह मंत्रालयाने जमात ए इस्लामीचा प्रमुख हामिद फैयाज याच्यासह ३५० पेक्षा अधिक सदस्यांना अटक केली होती. दरम्यान, जेकेएलएफवर बंदी घालून केंद्र सरकारने काय साध्य केले? असा प्रश्न जम्मू काश्मीरच्या माजी मुख्यमंत्री मेहबुबा मुफ्ती यांनी ट्विटरद्वारे विचारला आहे. जम्मू काश्मीरचा प्रश्न चर्चेने आणि शांततेने सोडवण्यासाठी यासिन मलिकने हिंसक कारवाया करणे थांबवले आहे. दिवंगत पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी त्यांच्या कार्यकाळात जम्मू काश्मीरसंदर्भातील चर्चेत यासिन मलिकला सहभागी करून घेतले होते याचीही आठवण मुफ्ती यांनी केली आहे.

माढ्याचा तिढा सुटला

संजय शिंदे यांना राष्ट्रवादीची उमेदवारी

सोलापूर, (प्रतिनिधी) : गेल्या अनेक दिवसांपासून संपूर्ण राज्याचे लक्ष लागलेल्या माढा लोकसभा मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेसने संजय शिंदे यांची उमेदवारी जाहीर केली आहे. खुद्द शरद पवार यांनीच बारामती येथील कार्यक्रमात संजय शिंदे यांची उमेदवारी जाहीर केली.

खुद्द पक्षाध्यक्षांनीच घेतलेली माघार यामुळे माढा मतदारसंघात राष्ट्रवादीसाठी मोठा तिढा निर्माण झाला होता. मात्र, हा तिढा काल खुद्द पवारांच्या उपस्थितीत सुटला. शिवसेना-भाजपच्यामदतीने सोलापूर जिल्हा परिषदेचे अध्यक्ष असलेले शिंदे यांनी शरद पवार यांच्या उपस्थितीत काल राष्ट्रवादीत प्रवेश केला. सुरुवातीला माढ्यासाठी शरद पवार यांचेच नाव चर्चेत होते. मात्र, राष्ट्रवादीचे नेते आणि माजी उपमुख्यमंत्री अजित पवारांचे पुत्र पार्थ यांना मावळमधून निवडणूक लढवायची असल्याने शरद पवार यांनी माघार घेतली. एकाच कुटुंबातील अनेक सदस्यांना उमेदवारी नको, असे म्हणत पवारांनी निवडणूक लढवण्यास नकार दिला.

सध्या राष्ट्रवादीचे नेते विजयसिंह मोहिते-पाटील लोकसभेत माढ्याचे प्रतिनिधित्व करतात. विजयसिंह यांचे पुत्र राष्ट्रवादीकडून लोकसभा निवडणूक लढवण्यास उत्सुक होते. मात्र, उमेदवारी मिळण्याची फारशी शक्यता दिसत नसल्याने त्यांनी नुकताच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत भाजपमध्ये प्रवेश केला.

रणजितसिंह भाजपमध्ये गेल्याने राष्ट्रवादी माढ्यातून कोणाला उमेदवारी देणार, याची जोरदार चर्चा होती. मात्र, काल या प्रश्नाचे उत्तर मिळाले असून माढ्याचा तिढा सुटला. शरद पवार यांनी बारामती येथील निवासस्थानी बैठक घेऊन संजय शिंदे यांच्या नावाची घोषणा केली.

संजय शिंदे हे मोहिते-पाटील यांचे कट्टर विरोधक समजले जातात. त्यांनी २०१४ मध्ये राष्ट्रवादीला रामराम करत स्वाभिमानी शेतकरी संघटनेकडून करमाळा विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवली होती. त्यात त्यांना थोड्या फरकाने पराभव पत्करावा लागला होता त्यामुळे माढ्यातील लढत अधिकच रंगतदार होईल, असे दिसून येते.

रविवारच्या केसरीत

बोईंग ७३७ चा ताजा धडा

विमाने तयार करणाऱ्या कंपन्यांमधली स्पर्धा आणि हवाई वाहतूक कंपन्यांना नफ्यासाठी विमानं घेण्याची असलेली घाई यामुळे प्रवाशांच्या जिवाशी अक्षम्य खेळ होत आहे. अलिकडेच बोइंग ७३७ मॅक्स ८ चा इथिओपियामध्ये घडलेला अपघात हे याचं उदाहरण आहे. विमानप्रवासाचे फायदे सर्वांनाच हवे आहेत; पण त्याहूनही सुरक्षित विमानप्रवासाला प्राधान्य दिलं जाणं अधिक महत्त्वाचं आहे. त्यावरून जगभर रण पेटलं आहे.

– उर्मिला राजोपाध्ये

दल बदलू आणि आघाड्यांची चलती...?

कोणत्याही एका पक्षाची लाट नसणं आणि प्रथमच मोठ्या संख्येनं मतदान करणारा युवावर्ग ही येत्या लोकसभा निवडणुकीची प्रमुख वैशिष्ट्यं आहेत. मोदी सरकारकडून तरूणाईचा अपेक्षाभंग झाला असला तरी तरूणवर्गाबाबत काँग्रेसचाही सकारात्मक कार्यक्रम अजून समोर आलेला नाही. या पार्श्वभूमीवर आघाड्यांची समीकरणं आकाराला येत आहेत. – हेमंत देसाई

'अर्था अर्थी'- गुंतवणूक आंतरराष्ट्रीय फंडांमधली-**महेश देशपांडे**

जंगल कथा-निर्लेप सौंदर्याचं 'रण' – **राजीव पंडित**

राज्य रंग -ओरिसात पटनाईक यांची कसोटी-**प्रा. नंदकुमार गोरे**

खास लेख- धास्ती वाढत्या कार्बन उत्सर्जनाची – **अभय देशपांडे**

या शिवाय- * भविष्य * शब्दकूट * असा वाचकप्रिय मजकूर आणि **'हितगुज'**